पुढारी | गुरुवार १९ मार्च २०१५

# दोडामार्ग महाविद्यालयाच्या वतीने तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप

दोडामार्ग : वार्ताहर

विद्यार्थ्यांनीजीवनाकडेसकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. पदवीनंतर नोकरी व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्यासाठी स्वतःमधील क्षमता ओळखून व विविध कौशल्याचा विकास करा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष अभिजीत हेगशेटये यांनी केले.



दोडामार्ग : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभिजीत हेगशेटये. सोबत प्राचार्य डॉ. पाटील व अन्य. (छाया : रत्नदीप गवस)

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित शुभेच्छा कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. बी. ए., बी. कॉम. परीक्षेत विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण झालेल्या वंदना पटकारे, ईशा बर्वे, स्वप्नगंधा नाईक, पूनम गवस या विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी मार्गदर्शन केले.